## हवामानावर आधारीत कृषि सल्ला (पालघर जिल्हा)

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ०८/२०२०** **दिनांक २८/०१/२०२०** **कालावधी ५ दिवस**


**डॉ. प्रशांत बोडके,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२०४१३२५५

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक २२/०१/२०२० ते २८/०१/२०२०) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक २९/०१/२०१९ सकाळी ८:३० पासून ०२/०२/२०२० सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २२/०१ | २३/०१ | २४/०१ | २५/०१ | २६/०१ | २७/०१ | २८/०१ | | २९/०१ | ३०/०१ | ३१/०१ | ०१/०२ | ०२/०२ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | १ | ० | ० | ० | ० |
| ३०.० | ३३.० | ३३.८ | ३३.५ | ३३.८ | ३३.६ | २९.४ | कमाल तापमान (अं.से) | २३ | २३ | २७ | २७ | २८ |
| १७.६ | १९.४ | १९.० | १९.४ | १७.६ | १८.० | १७.४ | किमान तापमान (अं.से) | १४ | ११ | १३ | १३ | १६ |
| ० | ० | ० | ० | ० | ० | ० | मेघाच्छादन (ऑक्टा) | ३ | ० | ० | १ | ० |
| ८० | ७४ | ८३ | ८१ | ८१ | ९२ | ९० | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ७७ | ५५ | ५१ | ४८ | ३५ |
| ४८ | ५१ | ४८ | ४८ | ४३ | ४९ | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ५३ | ३३ | १८ | २१ | १५ |
| २.५ | ४.२ | ४.४ | ४.४ | ३.९ | २.५ | २.३ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ८.५ | ९.० | ७.५ | ९.५ | १२.७ |
| द. | नै.द. | पू. | आ.द. | द. | शांत | आ.पू. | वाऱ्याची दिशा | वा.प. | ई.पू. | ई.पू. | वा.प. | पू. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०२० पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | ०.० | ४२३३.४ |

### हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

**दिनांक २९ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०२० दरम्यान कमाल व किमान तापमानात वाढ संभवत असून आकाश निरभ्र राहील.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भात | वाढीची अवस्था | • भात पुनर्लागवडीनंतर पहिल्या ३० दिवसांपर्यंत शेतात पाण्याची पातळी २.५ ते ५ सें. मी. ठेवावी |
| वाल | दाणे अवस्था | • वाल पिकामध्ये शेंगा पोखरणारी अळी व घाटे अळीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असून किडीचा प्रादुर्भाव सुरुवातीला कोवळ्या कळ्यावर दिसून येतो व नंतर शेंगामध्ये शिरून कोवळ्या दाण्यांवर उपजीविका करते. किडींचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी किडग्रस्त शेंगा काढून नष्ट कराव्यात व क्विनोलफॉस २५ टक्के प्रवाही २० मि. ली. किंवा डायमेथोएट ३० टक्के प्रवाही २० मि. ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून १५ दिवसांच्या अंतराने दोन फवारण्या कराव्यात. तसेच शेतामध्ये पक्षी थांबे उभारावे.<br>• वाल पिक फुलोऱ्यात येण्याची व दाणे भरण्याची अवस्था ओलाव्यासाठी अति संवेदनशील असल्याने वाल पिकास फुलोऱ्या येण्याच्या अवस्थेत पाणी देण्याची व्यवस्था करावी.<br>• वाल पिकामध्ये अमरवेलीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी अमरवेल उपटून जाळून नष्ट करून टाकावीत. |
| हरभरा | फुलोरा अवस्था | • हरभरा पिकावरील घाटे अळीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने नियंत्रणासाठी प्रति हेक्टरी ५-१० कामगंध सापळे आणि पक्षी थांबे लावावेत. |
| आंबा | मोहोर अवस्था | • मोहोर अवस्थेत असलेल्या आंबा पिकावर कीड व रोगाच्या नियंत्रणासाठी मोहोर संरक्षण वेळापत्रकानुसार तिसरी फवारणी मोहोर फुलण्यापुर्वी (दुसऱ्या फवारणी नंतर १५ दिवसांनी) नियंत्रणासाठी इमिडाक्लोप्रीड १७.८ टक्के प्रवाही ३ मि. ली. ६ मि. ली. अधिक संयुक्त बुरशीनाशक (कार्बेन्डॅझिम १२% + मन्कोझेब ६३%) १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. तसेच फवारणीच्या वेळेस किटकनाशकाच्या द्रावणामध्ये भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी ५ टक्के हेक्झाकोनॅझोल ५ मि. ली. किंवा पाण्यात विरघळणारे ८० टक्के गंधक २० ग्रॅम प्रति १० लिटर या प्रमाणात वापरावे. |
| काजू | फळधारणा अवस्था | • फळधारणा झालेल्या काजू पिकावर ढेकण्या व फुलकिडीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने किडींच्या नियंत्रणासाठी लॅम्बडा सायहॅलोथ्रीन प्रवाही ६ मि.ली. प्रति १० लि. पाण्यात मिसळून फवारणी करावी. (सदर कीटकनाशकास लेबल क्लेम नाहीत) |
| नारळ | - | • बाष्पीभवनामध्ये वाढ होत असल्याने, नवीन लागवड केलेल्या नारळ बागेत तीन ते चार वर्षे वयापर्यंतच्या माडाना ६ ते ७ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच पूर्ण वाढलेल्या माडांना जमिनीच्या मगदुराप्रमाणे ५ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी. आळ्यामध्ये ओलावा टिकविण्यासाठी नारळाच्या शेंडया पुराव्यात आणि झावळ्यांचे आच्छादन करावे.<br>• नारळावर सोंड्या भुंग्याचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. या किडीच्या अळ्या माडाच्या खोडातील मऊ गाभा खाऊन खोड आतून पोखरून काढतात. अळ्या खोडाच्या आत असल्याने प्रादुर्भाव झालेल्या ठिकाणी बुंध्यावर छिद्रे दिसतात व त्यातून ताजा भुसा व तांबूस तपकिरी स्त्राव वाहताना दिसतो. या किडीच्या नियंत्रणासाठी छिद्रातून शक्य असतील तेवढया अळ्या कोयतीच्या सहाय्याने काढून टाकाव्यात. माडाला कोणत्याही प्रकारे इजा करू नये आणि झाल्यास त्याला बोर्डोपेस्ट लावावी. तसेच सोंड्या भुंग्याच्या नियंत्रणासाठी बागेत प्रति हेक्टरी २ गंध सापळे लावावेत. |
| वांगी | फळधारणा | • वांगी पिकावर शेंडा व फळे पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी किडग्रस्त शेंडे व फळे जमा करून नष्ट करावीत व फेनव्हलरेट १० मि.ली. किंवा डेल्टामेथ्रीन २.८ टक्के प्रवाही १० मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| फळबाग रोपवाटिका | वाढीची अवस्था | • बाष्पीभवनामध्ये वाढ होत असल्याने, फळबाग रोपवाटिकेस, नवीन लागवड केलेल्या फळबागा तसेच भाजीपाला पिकास नियमित पाणी देण्याची व्यवस्था करावी.<br>• फळबाग रोपवाटिकेतील गवत काढून स्वच्छता ठेवावी व गरजेनुसार रोपांसाठी सावली करावी. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसारतयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**